## ममतामयी निरंकारी माता सविन्दर हरदेव जी
## साकार से निराकार -एक दिव्य सफर

"अनेकतेत एकता आणि वसुधैव कुटुंबकम" चे महान सूत्र प्रदान करत अवघ्या धरतीवर वसणाऱ्या मानवमात्राच्या सुख-समृद्धीसाठी आणि धरतीचे वातावरण स्वर्गमय बनविण्यासाठी आपले आयुष्य वेचणारी दिव्य विभूती सद्गुरु माता सविंदर हरदेवजी महाराज १७ मे, २०१६ रोजी संत निरंकारी मिशनच्या पाचव्या सद्गुरुच्या रुपात प्रकट झाली. उल्लेखनीय आहे की, मातृशक्तीच्या रुपात सद्गुरुचे अवतरण धारण करण्याचे प्रथम सौभाग्य त्यांना लाभले.

संत निरंकारी मिशनसाठीच नव्हे तर अवघ्या मानवतेसाठी तो समय अत्यंत प्रतिकूल होता जेव्हा मानवता आणि विश्वशांतीचे मसिहा युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज १३ मे, २०१६ रोजी अमेरिकेतील मॉन्ट्रीयल शहराजवळ एका कार दुर्घटनेत आपल्या नश्वर शरीराचा त्याग करुन निराकार रुपात विलीन झाले. संपूर्ण निरंकारी जगत त्यावेळी स्वत:ला अनाथ व निराधार समजत होते. भावनात्मकदृष्ट्या संभ्रमित आणि विचलित होते. अशा दुर्धर स्थितीमध्ये समस्त भक्तांना धैर्य व मार्गदर्शन देण्यासाठी सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी आपल्या हयातीतच दिलेल्या संकेतानुसार सद्गुरु माता सविंदर हरदेवजी महाराज यांनी संत निरंकारी मिशनची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. खरं तर त्यावेळी त्यांचे शारीरिक स्वास्थ्य फारसे चांगले नव्हते. परंतु संत संगतीचा आधार बनण्यासाठी आणि मानवतेच्या कल्याणार्थ त्यांनी आपले स्वास्थ्य पणाला लावून मिशनचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारली.

त्या असाधारण परिस्थितीत सद्गुरु माताजींनी आपल्या अलौकिक वाणीतून हाच संदेश दिला की, काहीही झाले तरी बाबाजींच्या शिकवणूकीनुसार आपण केवळ प्रेम आणि प्रेमच वाटत जायचे आहे. त्यांनी निरंकारी भक्तगणांना शपथ घ्यायला सांगितले की, आजपासून आपण सर्व एकोप्याने तेच कार्य करायचे आहे जे बाबाजींना अपेक्षित होते आणि या मिशनला उंच शिखरावर घेऊन जायचे आहे.

सद्गुरु माताजी सद्गुरु रुपात प्रकट झाल्याबरोबर समस्त निरंकारी जगताला धीर आला. त्यांच्या हृदयात शांती स्थापित झाली. अंध:कारमय दिसत असलेले भविष्य प्रकाशमय झाले, भविष्याची चिंता मिटली. कारण भक्तीसाठी सद्गुरु साक्षात साकार रुपात विराजमान असणे अनिवार्य असते तो त्यांना मिळाला. त्यावेळी अशी अद्भूत स्थिति निर्माण झाली की, एका बाजुला बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे पार्थिव शरीर पडलेले होते व त्याचे दर्शन घेताना भक्तांच्या डोळयांतील अश्रूधारा थांबत नव्हत्या तर दुसऱ्या बाजूला मनोमन एक आनंदही होत होता की, आपल्याला साकार सद्गुरु लाभला आहे.

सद्गुरु रुपात प्रकट प्रकट झाल्यानंतर ऑक्टोबर, २०१६ मध्ये सद्गुरु माताजींनी आपली पहिली कल्याण यात्रा चंदिगड तसेच हरियाणातील करनाल या शहरांमध्ये काढली आणि भक्तगणांना दर्शन व आशीर्वाद देऊन कृतार्थ केले. त्यानंतर आपल्या दोन वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी महाराष्ट्र, तेलंगना, पश्चिम बंगाल, ओरिसा, आन्ध्र प्रदेश, तामिळनाडु, कर्नाटक, उत्तराखण्ड, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, सिक्किम आदि राज्यांमध्ये कल्याण यात्रा काढल्या. तसेच याच दरम्यान विदेशातील कल्याण यात्राही केली. त्यामध्ये नेपाळ, अमेरिका, कॅनडा, यू.के. तसेच मध्य-पूर्वेकडील देशांमध्ये वसलेल्या भक्तगणांना आपल्या दिव्य दर्शनाने कृतार्थ केले.

सद्गुरु माताजींनी दरवर्षी दिल्लीमध्ये होणाऱ्या ६९व्या आणि ७०व्या वार्षिक निरंकारी सन्त समागमांची अध्यक्षता केली. त्यांमध्ये जगभरातून आलेल्या भाविक-भक्तगणांना आपले पावन आशीर्वाद प्रदान केले. या दरम्यान सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी रचलेली "सम्पूर्ण हरदेव बाणी" या काव्यात्मक ग्रंथाचे प्रकाशन ७०व्या वार्षिक संत समागमामध्ये केले आणि हा ग्रंथ मानव समाजाला अर्पण केला.

दिल्लीतील या संत समागमांव्यतिरिक्त जानेवारी, २०१७ मध्ये महाराष्ट्राचा ५०वा तसेच जानेवारी, २०१८ मध्ये महाराष्ट्राचा ५१वा वार्षिक संत समागम सद्गुरु माताजींच्याच पावन छत्रछायेखाली संपन्न झाले. उत्तर-पूर्वेकडील राज्यांच्या कोलकाता आणि सिलीगुडी येथे झालेल्या दोन संत समागमांची पावन अध्यक्षताही सद्गुरु माताजींनी केलीया संत समागमांतून त्यांनी एका बाजूला मानवमात्राला प्रेम व शांतीचा संदेश दिला तर दुसऱ्या बाजुला भक्तगणांना भरपूर आशीर्वाद प्रदान केले. त्यानंतर उत्तर प्रदेशचा प्रादेशिक संत समागम वाराणसीमध्ये सद्गुरु माताजीच्या छत्रछायेखाली संपन्न झाला. सन २०१७ व २०१८मधील दोन्ही भक्ती पर्व समागम संत निरंकारी आध्यात्मिक परिसर, समालखा येथे सद्गुरु माताजींच्याच पावन उपस्थितीत पार पडले.

१४ जानेवारी, २०१८ रोजी समालखामध्ये आयोजित भक्तिपर्व समागमाच्या वेळी संत निरंकारी आध्यात्मिक परिसर, समालखा हे स्थान समागम स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी तसेच याकरिता सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी तयार केलेल्या प्रारुप आराखड्यास मूर्त रुप देण्यासाठी हे स्थळ विकसीत करण्याचा कामाचा प्रारंभ केला.

### जीवन परिचय

माता सविंदरजी यांचा जन्म १२ जानेवारी, १९५७ रोजी यमुनानगर (हरियाणा) येथील श्री.मनमोहन सिंहजी आणि श्रीमती अमृत कौरजी यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे पालन-पोषण फर्रुखाबाद

(उत्तर प्रदेश) येथील श्री.गुरमुख सिंह आनन्दजी आणि श्रीमती मदन कौरजी यांनी केले. कारण बालपणापासूनच त्यांनी सविंदरजींना दत्तक घेतले होते. त्यामुळे बाल्यावस्थेपासूनच त्यांना पूज्य मदन कौरजी आणि श्री.गुरमुख सिंहजी यांची ममता व स्नेह प्राप्त झाला.

माता सविंदरजी यांचे प्राथमिक शिक्षण फर्रुखाबाद येथे झाले. त्यानंतर सन १९६६ मध्ये त्यांनी जीजस □न्ड मेरी कान्वेंट स्कूल, मसूरी (उत्तराखण्ड) येथून माध्यमिक शिक्षण घेतले व सन १९७३ मध्ये सिनियर सेकंडरी परीक्षा उत्तीर्ण केली. दिल्लीतील दौलतराम कॉलेज येथून त्यांनी उच्चशिक्षण ग्रहण केले.

१४ नोव्हेंबर, १९७५ रोजी त्यांचा विवाह आपका विवाह निरंकारी बाबा गुरबचनसिंहजी व निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी यांचे सुपुत्र श्री.हरदेवसिंहजी यांच्या समवेत निरंकारी पद्धतीने साध्या रुपात संपन्न झाला. त्यांना तीन मुली आहेत - समताजी, रेणुकाजी व सुदीक्षाजी | तिन्ही मुलींचे पालनपोषण त्यांनी आल्या मातृत्वाच्या छायेखाली केले आणि संपूर्ण गृहस्थाश्रमाची उत्तरदायित्वे यथासांग पार पाडली.

विवाहानंतर वर्ष १९७५ व १९७६ त्या आपले पती श्री.हरदेवसिंहजी यांच्याबरोबर बाबा गुरबचनसिंहजी आणि निरंकारी राजमाताजी यांनी आयोजित केलेल्या विश्वकल्याण यात्रेमध्ये सहभागी झाल्या. त्या दौऱ्यामध्ये कुवेत, इराक, थायलंड, हाँगकांग, कॅनडा, यू.एस.ए., ऑस्ट्रिया आणि यू.के. आदि देशांचा समावेश होता.

सन १९८० मध्ये युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी ब्रह्मलीन झाल्याने निर्माण झालेल्या विपरीत व आव्हानात्मक परिस्थितीत त्यांचे पति श्री.हरदेवसिंहजी यांच्यावर संत निरंकारी मिशनची जबाबदारी सोपविण्यात आली. तेव्हापासून संत संगतीने त्यांना "पूज्य माता सविन्दर जी" या नावाने संबोधित करण्यास सुरुवात केली. बाबा हरदेवसिंहजी यांच्या कालखंडात सतत ३६ वर्षे त्यांनी बाबाजींच्या खांद्याला खांदा लावून मिशनच्या प्रचार-प्रसारामध्ये योगदान दिले. बाबाजी आणि राजमाताजी यांच्यासमवते त्या मुख्य मंचावर सुशोभित होत राहिल्या आणि त्या रुपात संत संगतीला त्यांनी आपले भरपूर आशीर्वाद प्रदान केले. विदेशातील एखाद्याच दौऱ्यामध्ये त्या बाबाजींसमवेत गेल्या नाहीत असे झाले. पूज्य माताजींनी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांना प्राथम्याने सद्गुरु रुपातच पाहिले आणि आपले सांसारिक नाते मागे ठेवले.

माताजींचे हृदय दया व करुणेच्या अथांग सागरासारखे होते. त्या सदोदित सर्वांना सहनशीलतेची शिकवण देत राहिल्या. मौन राहून त्या गुरुभक्तीची प्रेरणा देत राहणे हाच त्यांचा स्वभाव होता. या स्वभावामुळेच त्या गुरुभक्त व सेवादारांकडे सदोदित लक्ष पुरवित राहिल्या. लहान बालकांबरोबर त्यांच्या मनामध्ये प्रचंड प्रेम होते त्यामुळे त्या बालकांचे लाडही खूप करत असत. आपले प्रेम आणि ममता प्रदान करण्यासाठी ही दिव्य विभूती सदोदित तत्पर असे. गुरुभक्तांचे जीवन सुंदर आणि आदर्श असावे असा त्यांचा आग्रह होता. आपल्या प्रकृतीची चिंता न करता त्यांनी सदोदित स्वत:ला भक्तगणांच्या व संतसंगतीच्या सान्निध्यात ठेवण्याचा प्रयास केला.

**सामाजिक सेवाओं में योगदान**

आध्यात्मिक कार्याबरोबरच सद्गुरु माताजींनी मानवसेवेच्या कार्यांकडेही पूर्णपणे लक्ष दिले. फेब्रुवारी, २०१७ मध्ये गुरुपूजा दिवसाच्या प्रसंगी सद्गुरु माताजींच्या निर्देशानुसार संत निरंकारी चॅरिटेबल फौंडेशनच्या वतीने देशभरात २६३ मोठी रेल्वे स्थानके स्वच्छ करण्यात आली तसेच सन २०१८ रोजी याच गुरु पूजा दिवशी देशातील २७५ मोठ्या शहरांतील ६३५ सरकारी हॉस्पिटलांची साफसफाई करण्यात आली.

विश्व पर्यावरण दिवस, ५ जून, २०१७ रोजी फाउंडेशनच्या वतीने देशातील ८ पर्वतीय स्थळांवर वृक्षारोपण करण्यात आले जिथे ग्रीष्म ऋतूमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. सन २०१८ मध्ये याच दिवशी देशातील ७ राज्यांमधील १४ पर्वतीय स्थळांवर स्वच्छता अभियान व वृक्षारोपण करण्यात आले. याशिवाय टाईम्स ऑफ इंडिया व एनडीटीव्ही यांनी आयोजित केलेल्या वृक्षारोपण व स्वच्छता अभियानांमध्ये संत निरंकारी मिशनने उल्लेखनीय योगदान दिले.

माता सविंदर हरदेवजी महाराज यांच्या प्रेरणेतून २०१७-१८ मध्ये ५१४ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले जे स्वयमेव एक नवे रेकॉर्ड होते. या शिबिरांतून ८३,३४१ युनिट रक्त संकलित करण्यात आले. २४ एप्रिल, २०१८ रोजी मानव एकता दिवसानिमित्त आयोजित केलेल्या ८४ रक्तदान शिबिरांमध्ये १९,३०७ युनिट रक्तदान करण्यात आले.

माता सविंदरजी यांनी प्रत्येक क्षेत्रात महिलांना सक्षम बनविण्यासाठी प्रयासरत राहिल्या. समाजकल्याणाच्या क्षेत्रात त्यांना विशेष रुची होती. वृक्षारोपण व स्वच्छता अभियानात भाग घेणाऱ्या, सिलाई व विणकाम केंद्रांतून प्रशिक्षण प्राप्त केलेल्या महिलांच्या बाबतीत त्यांनी सदोदित आपुलकीची भावना बाळगली. तुरुंगातील कैद्यांच्या जीवनात सुधारणा व आध्यात्मिक जागृती घडवून आणण्याचा त्यांचा सतत प्रयास होता. त्याच प्रयासातून तिहार, ठाणे, तळोजा, येरवडा यांसारख्या तुरुंगांमध्ये संत निरंकारी मिशनचे आध्यात्मिक सत्संग कार्यक्रम नियमितपणे चालू झाले आहेत. सद्गुरु बाबाजींच्या कालखंडात संत समागमांच्या दरम्यान आपल्या कार्यबाहुल्यातून वेळात वेळ काढून त्या अनाथाश्रमांना भेट देत असत आणि तेथील आश्रमवासियांना फळे, खाद्यपदार्थ आणि ब्लँकेट इत्यादी भेट देत असत.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान**

सद्गुरु माता सविंदर हरदेवजी महाराज यांनी आध्यात्मिक व मानव कल्याणासाठी दिलेल्या योगदानाची प्रशंसा करुन लाईफ काइरोप्रेक्टिक कॉलेज वेस्ट संस्था (अमेरिका) यांच्याकडून माताजींना "सर्विस टू ह्यूमॅनिटी □वार्ड २०१७" द्वारे सन्मानित करण्यात आले. अशाच प्रकारे अमेरिकेतील एक आंतरराष्ट्रीय संस्था "वुई केअर फॉर ह्यूमॅनिटी" कडून त्यांना २०१८ करिता सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक विभूति हा सन्मान प्रदान करण्यात आला.

**सद्गुरु रुपात सुदीक्षाजी यांच्या नावाची घोषणा**

सद्गुरु माता सविंदर हरदेवजी यांनी परमपूज्य सुदीक्षाजी यांनी १६ जुलै, २०१८ रोजी सद्गुरुची जबाबदारी सोपवून त्यांनी निरंकारी मिशनमधील एका ऐतिहासिक घटनेची पुनरावृत्ती केली. म्हणजेच ज्याप्रमाणे सद्गुरु बाबा अवतारसिंहजी यांनी त्यांच्या हयातीतच बाबा गुरबचनसिंहजी यांना सद्गुरु रुपात प्रकट केले आणि स्वत: एक सामान्य गुरुभक्त बनले तद्वत सद्गुरु माताजींनी सद्गुरु रुपाची जबाबदारी सुदीक्षाजी यांच्यावर सोपवून स्वत: सामान्य भक्त बनून राहिल्या. १७ जुलै, २०१८ रोजी दिल्लीमध्ये एका विशाल सत्संग समारोहामध्ये विधिवत रुपात सद्गुरु माता सविंदर हरदेवजी यांनी पूज्य सुदीक्षाजी यांच्या मस्तकावर तिलक लावून त्यांना सद्गुरुच्या पावन आसनावर विराजमान केले आणि सद्गुरुच्या आध्यात्मिक शक्तिंचे प्रतीक असलेला सफेद दुपट्टा त्यांच्या गळयात घातला. अशाप्रकारे मानवतेचे हे महान मिशन पुढे घेऊन जाण्याची परिपूर्ण व्यवस्था त्यांनी आपल्या हयातीतच करुन ठेवली.

**साकार से निराकार**

पूज्य माता सविन्दर जी यांची प्रकृती काही दिवसांपासून साथ देत नव्हती. ५ ऑगस्ट, २०१८ रोजी त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला आणि निराकार स्वरुपात विलीन झाल्या. त्यांचे पार्थिव शरीर अंतिम दर्शनासाठी निरंकारी चौकाजवळ, ग्राऊंड नं.८ येथे ७ ऑगस्ट पर्यंत ठेवण्यात आले होते. देशविदेशातून आलेल्या लाखो भाविक-भक्तगणांनी त्यांचे अंत्यदर्शन घेत साश्रू नयनांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर ८ ऑगस्ट, २०१८ रोजी ग्राऊंड नं.८ येथून निगम बोध घाटपर्यंत त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली आणि भक्तगणांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला.

निगम बोध घाट येथे सीएनजी शवदाहिनीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले आणि त्याच दिवशी सायंकाळी ग्राउंड नं.८ येथे मिशनच्या वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी यांच्या पावन सान्निध्यात प्रेरणा दिवस समारोहाचे आयोजन करण्यात आलेया कार्यक्रमामध्ये पूज्य माता सविंदर हरदेवजी यांना श्रद्धासुमने अर्पित करण्याबरोबरच त्यांचे दिव्य जीवन व शिकवणूकीतून प्रेरणा घेण्यात आली या समारोहामध्ये उपस्थित लाखोंच्या जनसमुदायाला संबोधित करताना सद्गुरु माता सुदीक्षाजी यांनी सांगितले की, आज या प्रेरणा दिवस समारोहामध्ये आपण एका अशा मातेचे स्मरण करत आहोत जी केवळ आम्हा तीन मुलींची आई नव्हती तर समस्त संत संगतीची माता होती. त्यांनी सदोदित सर्वांना आपले प्रेम आणि स्नेह प्रदान केला.

या समारोहात देशविदेशातील निरंकारी भक्तगणांसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून माता सविंदर हरदेवजी यांच्या प्रति आपली श्रद्धांजली अर्पण केली. त्यामध्ये दिल्लीचे आरोग्य मंत्री श्री.सत्येंद्र जैन, हरियाणाचे माजी मुख्य मंत्री श्री.भूपेंद्र सिंह हूड्डा तसेच खासदार श्री.मनोज तिवारी यांचा समावेश होता. आपल्या भावना व्यक्त करताना खासदार श्री.मनोज तिवारी म्हणाले की, माताजींच्या जाण्याने केवळ निरंकारी मिशनलाच नव्हे तर अवघ्या विश्वातील समस्त आध्यात्मिक जगताचे कधीही भरुन ने येणारे नुकसान झाले आहे. ते पुढे म्हणाले की, भारताचे माननीय प्रधान मंत्री तसेच माननीय गृह मंत्री यांनीही माताजींच्या देहावसानाच्या प्रति आपले संवेदना संदेश प्रेषित केले आहेत.

तसे पाहिले तर पूज्य माता सविन्दरजी यांना निरंकारी सद्गुरु रुपात मिशनला मार्गदर्शन करण्याची संधी सुमारे दोन वर्षे काही महिन्यापर्यंतच लाभली. तथापि, खरे पाहता सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या ३६ वर्षांच्या कार्यकालातही त्यांनी पूर्णपणे स्वत:ला समर्पित करुन बाबाजींच्या समवेत मिशन व मानवतेला मार्गदर्शन केले. त्यांची सेवा, भक्ति, समर्पण व मार्गदर्शन मानवमात्राच्या मनामध्ये चिरंतन निवास करत राहील आणि आध्यात्मिक मार्गाच्या पथिकांना आपले लक्ष्य गाठण्यास सहाय्यक सिद्ध होईल.

**युग निर्माता सद्गुरु माता, ममता-प्रेमाचे तू रुप साकार,**
**मानवतेचे नमन तुम्हाला, शत्-शत् वार, शत्-शत् वार ।**

*प्रस्तुति : स.वि.लव्हटे (नवी मुंबई)*